कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम-२०१३ मधील तरतुदीनुसार अंतर्गत तक्रार समितीची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
कार्यालयीन आदेश क्रमांक संकीर्ण-२७१९/प्र.क्र.३६/का-२१ आस्था
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०७ मार्च, २०१९.

संदर्भ :-१) महिला व बालविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक मकक-२०१०/प्र.क्र.४६/मकक, दि.११.०६.२०१०.
२) महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दि.१९.०६.२०१४.

कार्यालयीन आदेश :-

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात रिट विनंती अर्ज (सीआर एल) क्रमांक ६६६-७०/१९९२ दाखल झाला होता. त्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार केंद्र शासनाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ व नियम दि.९ डिसेंबर, २०१३ रोजी प्रसिध्द केला आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार लैंगिक छळाबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी करणे व त्यानुसार कारवाईची शिफारस करणे याकरिता समिती स्थापन करण्याच्या सूचना महिला व बाल विकास विभागाने संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये दिले आहेत. त्यानुसार मंत्री आस्थापनेच्या अधीनस्थ मा.मुख्यमंत्री सचिवालय, मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्या कार्यालयातील प्रतिनियुक्तीने कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी लैंगिक छळाबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी करणे व त्यानुसार कार्यवाहीची शिफारस करणे याकरिता खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

१.	श्रीमती सुनिता जाधव, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (२१ रोख)	:	अध्यक्ष
२.	श्रीमती संगिता गुल्हाणे, कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (२१ अ)	:	सदस्य
३.	श्रीमती गिता यादव, कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय	:	सदस्य
४.	श्रीमती शिल्पा नातू, कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय	:	सदस्य
५.	श्रीमती सु.सं.राणे, कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग (२१ आस्था)	:	सदस्य सचिव
६.	श्रीमती सुनिला भिसे, संचालक, सावली प्रतिष्ठान, अ/२, धनराज अपार्टमेंट दिवानमन नवयुग नगर, वसई रोड (पश्चिम), तालुका पालघर ४०१२०१.	:	अशासकीय सदस्य

२. मा.मुख्यमंत्री सचिवालय, मा.मंत्री व मा.राज्यमंत्री कार्यालयात प्रतिनियुक्तीने कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांना याद्वारे असे कळविण्यात येते की, त्यांनी लैंगिक छळासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यास, ती महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष किंवा सदस्य सचिवांकडे सादर करावी.

३. उपरोक्त समिती मा.मुख्यमंत्री सचिवालय, मा.मंत्री व मा.राज्यमंत्री कार्यालयात प्रतिनियुक्तीने कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून लैंगिक छळासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करुन कारवाईची शिफारस करेल.

४. उपरोक्त समितीच्या नावाचा फलक विभागाच्या दर्शनीच लावण्याची कार्यवाही कार्यासन २१-अ यांनी तात्काळ करावी.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१२४५२९८३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Namdeo Kashinath Mali

Digitally signed by Namdeo Kashinath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d3cbafce2e197ab3683c7133deabfac4ef56ca53d2af01b1b3648a21a985c629, serialNumber=1178e48d2f5be414ade2c612247d3db669147cf3ef4acbe3fc4adba8ff18e1d9, cn=Namdeo Kashinath Mali
Date: 2019.03.07 12:47:00 +05'30'

(ना.का.माळी)
अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग

प्रत,

१. सह सचिव (आस्थापना), मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सर्व महिला अधिकारी/कर्मचारी, मा.मुख्यमंत्री सचिवालय/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
४. श्रीमती सुनिता जाधव, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (२१ रोख), मंत्रालय, मुंबई-३२.
५. श्रीमती संगिता गुल्हाणे, कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (२१ अ), मंत्रालय, मुंबई-३२.
६. श्रीमती गिता यादव, कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२.
७. श्रीमती शिल्पा नातू, कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२.
८. श्रीमती सु.सं.राणे, कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग(२१ आस्था), मंत्रालय, मुंबई-३२.
९. श्रीमती सुनिला भिसे, संचालक, सावली प्रतिष्ठान, अ/२, धनराज अपार्टमेंट, दिवानमन नवयुग नगर, वसई रोड (पश्चिम), तालुका पालघर ४०१२०१.
१०. अवर सचिव (मकक), महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
११. निवड नस्ती (का-२१ आस्था)